महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
Maharashtra Housing & Area Development Authority
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

==================================================================

जावक क्रमांक – ५४४ / ८४ दिनांक :- २२ डिसेंबर, २०२३

प्रसिद्धिपत्रक

# म्हाडातर्फे मास्टर लिस्टवरील पात्र अर्जदारांची २८ डिसेंबर रोजी संगणकीय सोडत - 'म्हाडा' चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल

## ऐतिहासिक निर्णयामुळे बृहतसूचीवरील सदनिका वितरण प्रक्रिया अधिक पारदर्शक, गतिमान होणार

मुंबई, २२ डिसेंबर, २०२३ :- म्हाडाच्या मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील बृहतसूचीवरील (मास्टर लिस्ट) जुन्या उपकरप्राप्त इमारतीतील भाडेकरू-रहिवाशी यांना सदनिकांचे वितरण करण्यासाठी दि. २८ डिसेंबर, २०२३ रोजी दुपारी एक वाजता वांद्रे पूर्व येथील म्हाडा मुख्यालयात संगणकीय सोडत काढण्यात येणार आहे, अशी माहिती म्हाडाचे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी आज दिली. या ऐतिहासिक निर्णयामुळे बृहतसूचीवरील सदनिका वितरण प्रक्रिया अधिक पारदर्शक, गतिमान होणार असून सदनिका वितरणाच्या प्रक्रियेत सुसूत्रता येणार असून भाडेकरू/रहिवाशी यांच्या तक्रारी कमी होण्यास मदत होणार असल्याचे श्री. जयस्वाल यांनी सांगितले.

श्री. जयस्वाल म्हणाले की, जुन्या उपकरप्राप्त इमारतीतील पात्र भाडेकरू / रहिवाशी यांना बृहतसूचीवरून सदनिका वितरण करण्यासाठीची नियमावली निश्चित करण्यात आली असून त्यासंदर्भातील परिपत्रक आज जारी करण्यात आले. बृहतसूचीवरून भाडेकरू / रहिवाशी यांना सदनिका वितरणाच्या धोरणाचा भाग म्हणून यापूर्वीचे प्राधिकरणाचे ठराव, परिपत्रके, आदेश रद्द, अधिक्रमित, सुधारित करून त्यामध्ये बदल करण्यात आला आहे. नवीन नियमावलीनुसार निवासी गाळा वितरणाची मर्यादा निश्चित करण्यात आली असून निवासी गाळ्यांचे वितरण संगणकीय प्रणालीने करण्याचा निर्णय घेऊन त्याची तात्काळ अंमलबजावणी केली जात असल्याचे श्री. जयस्वाल यांनी सांगितले.

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील उपकरप्राप्त इमारतीमधील ज्या भाडेकरू/ रहिवाशी यांना निष्कासन सूचना (व्हेकेशन नोटीस) देऊन इमारत खाली करण्यात आली आहे व त्यांच्या मूळ इमारतीचा अरुंद भूखंड, आरक्षण, रस्ता रुंदीकरण या कारणामुळे पुनर्विकास शक्य नाही. तसेच उपकरप्राप्त इमारती पुनर्रचित झाल्या आहेत, मात्र कमी गाळे बांधले गेले आहेत अशा वंचित मूळ भाडेकरू/ रहिवाशी यांना यापूर्वी मंडळाद्वारे पुनर्रचित / पुनर्विकसित इमारतीमध्ये कायमस्वरूपी गाळा देण्यात आलेला नाही व त्यांचे वारसदार संक्रमण शिबिरात किंवा इतर ठिकाणी राहत आहेत अशा बृहतसूचीवरील पात्र मूळ भाडेकरू / रहिवाशी अथवा त्यांचे वारसदार यांची संगणकीय सोडत काढण्यात

येणार असल्याचे श्री. जयस्वाल यांनी सांगितले. २८ डिसेंबर रोजी काढण्यात येणाऱ्या संगणकीय सोडतीसाठी एकूण ४०० सदनिका उपलब्ध असून बृहतसूचीवरून पात्र अर्जदारांची संख्या २६५ असल्याचे ते म्हणाले.

बृहतसूचीवरील भाडेकरू/रहिवाशांकडून आलेल्या अर्जावर, दावे/हरकतीवर निर्णय घेऊन वितरण यादी अंतिम करण्यासाठी पाच सदस्यीय समिति गठित करण्यात आली आहे. समितीने आदेश दिल्यानंतर हरकती व सूचनांकरिता सात दिवसांच्या कालावधिकरिता म्हाडाच्या संकेतस्थळावर सूचना प्रसिद्ध करण्यात येणार आहे. बृहतसूची समितीने अर्जदारांची पात्रता सिद्ध केल्यानंतर निष्कासन सुचनेच्या दिनांकाच्या ज्येष्ठतेप्रमाणे यादी तयार करण्यात येणार आहे. बृहतसूची समितीच्या सुनावणीचा निर्णय म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे निर्देश संबंधितांना दिल्याचे श्री. जयस्वाल यांनी सांगितले.

विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) व ३३ (९) अंतर्गत ना हरकत प्रमाणपत्रांद्वारे उपलब्ध करून दिलेल्या सदनिकांची यादी बृहतसूचीवरील भाडेकरू / रहिवाशी यांना वितरणासाठी म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे.

संगणकीय सोडतीसाठी सदनिकांच्या उपलब्धतेनुसार पात्र अर्जदारांची संख्या त्यांच्या निष्कासन सुचनेच्या तारखेच्या ज्येष्ठतेनुसार निश्चित करण्यात येणार आहे. भाडेकरू / रहिवाशी यांची पात्रता निष्कासन सूचनेच्या आधारे निश्चित झाल्यानंतर सोडतीत सदनिका विजेता घोषित झाल्यावर अर्जदाराने सदनिका नाकारल्यास अर्जदारास सदनिका घेण्यात स्वारस्य नसल्याचे मानून त्याचा बृहतसूचीवरील हक्क संपुष्टात येणार आहे. संगणकीय सोडतीनंतर अर्जदाराने १५ कार्यालयीन दिवसांच्या आत उपमुख्य अधिकारी, पुनर्रचित गाळे विभाग यांच्याकडे स्वीकृती पत्र सादर करणे गरजेचे आहे. सदर स्वीकृती पत्र १५ दिवसांच्या आत सादर न झाल्यास भाडेकरू / रहिवाशी यांना या सदनिकमध्ये स्वारस्य नसल्याचे गृहीत धरून बृहतसूचीवरील हक्क संपुष्टात येणार असल्याचे श्री. जयस्वाल यांनी सांगितले.

अर्जदाराने देकारपत्र प्राप्त झाल्यानंतर ४५ दिवसांच्या आत देकारपत्रातील नमूद अटी व शर्तींची पूर्तता करून ताबा घेणे बंधनकारक असून तसे न केल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता सदनिकेचे वितरण रद्द होणार असून बृहतसूचीवरील हक्क संपुष्टात येणार असल्याचे श्री. जयस्वाल म्हणाले.

बृहतसूचीवरील पात्र अर्जदारांना सदनिका वितरित करण्यासाठी निकष ठरविण्यात आले असून ३०० चौरस फूटापेक्षा कमी क्षेत्रफळाच्या जुन्या सदनिकाधारकाला ३०० ते ४०० चौरस फूट क्षेत्रफळाची सदनिका वितरित केली जाणार आहे. ३०१ ते ४०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या जुन्या सदनिकाधारकाला ४०० ते ५०० चौरस फूट क्षेत्रफळाची सदनिका वितरित केली जाणार आहे. ४०१ ते ५०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या जुन्या सदनिकाधारकाला ५०० ते ६०० चौरस फूट क्षेत्रफळाची सदनिका वितरित केली जाणार आहे. ५०१ ते ६०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या जुन्या सदनिकाधारकाला ६०० ते ७०० चौरस फूट क्षेत्रफळाची सदनिका वितरित केली जाणार आहे. ६०१ ते ७०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या जुन्या सदनिकाधारकाला ७०० ते ७५३ चौरस फूट क्षेत्रफळाची सदनिका वितरित केली जाणार आहे. तसेच ७०१ व त्यावरील जुन्या सदनिकाधारकाला ७५३ चौरस फूट क्षेत्रफळापर्यंत सदनिका वितरित केली जाणार आहे.

गाळे वाटपाच्या धोरणात बदल करण्यात आला असून नवीन धोरणानुसार मूळ गाळयाच्या क्षेत्रफळापेक्षा अतिरिक्त क्षेत्रफळाचा गाळा लाभार्थ्यांना देण्याची तरतूद आहे. मूळ गाळा निशुल्क असून

अतिरिक्त क्षेत्रफळाकरिता चालू आर्थिक वर्षाच्या रेडिरेकनर दराच्या १२५ टक्के दराने अधिमूल्याची आकारणी करून वितरित करण्यात येणार असल्याचे श्री. जयस्वाल यांनी सांगितले.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण